N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0647 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/10/2021 06:11 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 26/10/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/10/2021

**Time Period (कालावधी):** पहर 8 **Time From (वेळेपासून):** 22:34 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 23:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/10/2021 **Time (वेळ):** 05:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 009 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/10/2021 05:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शाहुपूरी पोलीस ठाणे ,कोल्हापूर ,आवारात

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. जितेंद्र किसनसिंग रजपूत

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :** (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by TapScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गणेश कॉलनी,उचगांव,ता करवीर,जि कोल्हापूर ,गांधी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गणेश कॉलनी,उचगांव,ता करवीर,जि कोल्हापूर ,गांधी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9130073473

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री सागर इरप्पा कोळी पो ना ब.नं.579 | | | 1. शाहुपूरी पोलीस ठाणे,, कोल्हापूर, शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000/ रूपये | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 0.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक- 27/10/2021 मी श्री. जितेंद्र किसनसिंग रजपूत वय 35 व्यवसाय जुन्या गाडया खरेदी विक्री,रा.गणेश कॉलनी, उचगांव, ता.करवीर,जि.कोल्हापूर मोबाईल नंबर 9130073473, आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर माझे कुटुंबासह एकत्रीत रहाणेस आहे. मी जुन्या गाडया खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो.मी श्री.नितीन कदम यांची इनोव्हा गाडी माझेकडे वापरण्यास आणली होती दि.25/10/2021 रोजी माकडवाला वसाहतीतील तानाजी व चारपाच व्यक्तीनी आमचे नितीन कदम हा पैसे देणे बाकी आहे असे म्हणून माझेकडून इनोव्हा गाडी जबरदस्तीने काढून घेवून गेले. त्यामुळे मी माझे मित्र अमित बुकशेट यांना घेवून शाहुपूरी पोलीस ठाणेत गाडी चोरीची तक्रार देण्यास गेलो. त्यावेळी तेथे उपस्थित ठाणे अंमलदार पोलीस नाईक श्री सागर कोळी यांना मी माझेकडील नितीन कदम यांची गाडी माकडवाला वसाहतीतील तानाजी व त्यांचे लोकांनी जबरदस्तीने चोरून नेली असल्याचे सांगून माझी तक्रार घेण्यास सांगीतले. त्यावेळी पोलीस नाईक कोळी यांनी माकडवाला वसाहतीतील तानाजी व त्यांचे लोकांना पोलीस ठाणेस बोलावून घेतले. त्यावेळी माझे मित्र बुकषेट व त्या लोकांमध्ये तसेच पोलीसांमध्ये वाद झाला. त्यांनतर पोलीस नाईक कोळी यांनी आमचेतील वाद मिटवून मला इनोव्हा गाडी परत देण्यास सांगितली. पोलीस नाईक कोळी यांनी मला वादातील इनोव्हा गाडी परत मिळवून देणेसाठी माझेकडे 15,000/- रू.रक्कमेची मागणी करून तात्काळ 10,000/-रू. दया असे सांगितले. सदरची इनोव्हा गाडी नितीन कदम यांची असलेने ती परत ताब्यात घेणे मला गरजेचे असलेने मी नाईलाजास्तव पोलीस नाईक कोळी यांनी मागितलेले 10,000/- त्यांना दिले त्यावेळी त्यांनी मला तानाजीने घेवून गेलेली इनोव्हा गाडी परत दिली. त्यांनतर पोलीस नाईक कोळी यांनी मला उर्वरीत 5,000/- इतकी रक्कम घेवून येणेस सांगीतले. तेव्हा त्यांना मी पैशांची जुळणी करून येतो असे सांगीतले असता त्यांनी दि.26/10/2021 रोजी भेटण्यास या असे सांगीतलेने मी तेथून निघून आलो. शाहुपूरी पोलीस ठाणेचे पोलीस नाईक सागर कोळी हे नितीन कदम यांची वादातील इनोव्हा गाडी परत मिळवून दिली म्हणून माझेकडून 10,000/- रू.लाच रक्कम घेतली असून पुन्हा मागत असलेले 5,000/- रूपये हे लाच म्हणूनच मागणी करीत असलेची मला खात्री झाली आहे. परंतू त्यांना लाच देणेची माझी इच्छा नसलेने मी माझे मित्र अमित बुकषेट यांचेसह दि.26/10/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात जावून श्री मोरे साहेबांना भेटून त्यांना माझी वरीलप्रमाणे तक्रार थोडक्यात सांगुन पोलीस नाईक सागर कोळी, षाहुपूरी पोलीस ठाणे यांचेवर कारवाई करण्याची विनंती केली. त्यावेळी श्री मोरे साहेबांनी गोपनीय कामाकरीता बाहेर गेलेले श्री बुधवंत साहेबांना माझे तक्रारी बाबत माहिती दिली. त्यानंतर श्री मोरे साहेबांनी दोन षासकीय पंच बोलावून घेतले.व माझी व त्यांचे स्टाफ व पंचाची ओळख करून दिली. व पंचाना माझी तक्रार सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर मी माझा लेखी तक्रारी अर्ज श्री.मोरे साहेबांना दिला त्यानंतर त्यांनी तो तक्रारी अर्ज पंचांना वाचावण्यास दिला. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झालेवर श्री मोरे साहेबांनी व दोन्ही



Scanned by TapScanner

शासकीय पंचांनी त्यावर सह्या केल्या. त्यावेळी श्री मोरे साहेबांनी मला पोलीस नाईक सागर कोळी यांनी पैसे कधी व कोठे घेवुन येण्यास सांगितले आहे असे विचारल्यावर, आज रात्री 21.00 वा षाहुपूरी पोलीस ठाणेत येण्यास सांगितल्याचे मी त्यांना सांगितले. श्री मोरे साहेबांनी सर्वाषी चर्चा करून सापळा कारवाई करीता रात्री 20.30 वा अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयात हजर राहण्याचे सर्वानुमते ठरविले.दि. 26/10/2021 रोजी रात्री अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयात आलेनंतर श्री.मोरे साहेबांनी मला व दोन्ही पंचांना पोलीस नाईक सागर कोळी हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी कोळी यांना भेटणेस जाताना माझेसोबत पंच नं 1 श्री.चव्हाण यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये नवीन सॅनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून दिली. मला व पंच श्री.चव्हाण यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मोरे साहेबांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून दिला व मला आणि माझे मित्र अमित बुकषेट यांना माझेकडील अँक्सेस स्कुटी MH-09-FS-1988 यावरून व पंच चव्हाण यांना त्यांचेकडील मोटर सायकलने षाहुपूरी पोलीस ठाणे येथील पोलीस नाईक सागर कोळी यांची भेट घेणेकरीता पाठविले. षाहुपूरी पोलीस ठाणे येथे गेलो असता तेथे पोलीस नाईक सागर कोळी यांची भेट झाली त्यावेळी त्यांनी मला माझे मित्र नितीन कदम यांची माकडवाला वसाहतीतील तानाजी यांनी नेलेली वादातील इनोव्हा गाडी परत मिळवून दिली म्हणून 5,000/- रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम लागलीच घेवुन येण्यास सांगितल्याने आम्ही माझे स्कुटीवरून व पंच चव्हाण आपले मोटर सायकलवरून परत अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयात परत आलो. त्यावेळी श्री.मोरे साहेबांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर श्री.मोरे साहेबांनी मला आपले ऑफीसच्या केबीनमधून बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांदा पंच चव्हाण यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत केबीनमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितलीत्यानंतर मोरे साहेबांनी डिजिटल रेकॉर्डरमधील माझे आणि पोलीस नाईक सागर कोळी यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाषणावरुन व पंच श्री.चव्हाण आणि माझे सांगणेवरुन पोलीस नाईक सागर कोळी यांनी मला नितीन कदम यांची माकडवाला वसाहतीतील तानाजी यांनी नेलेली वादातील इनोव्हा गाडी परत मिळवून दिली म्हणून 5,000/- रू. लाच रक्कम मागणी करून लागलीच घेवुन येण्यास सांगितलेचे निश्पन्न झाले.त्यामुळे श्री.मोरे साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असलेचे सांगितले. व मला पोलीस नाईक सागर कोळी यांना देणेकरीता लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले 500/-रु दराच्या 10 नोटा मिळून रु.5,000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा त्यांचेकडील स्टाफ श्री पाटील यांनी नोटांचे नंबर्स लिहून घेतले. त्यानंतर मोरे साहेबानी मला आणि पंचांना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे महत्व सांगुन गुणधर्म सांगितले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना कार्यालयातील टेबलवर पांढरा कागद अंथरुन त्यावर लाच रक्कमेतील नोटा ठेवून पो.ना. पाटील यांनी अँन्थ्रॉसिन पावडर लावून घेतली व कार्यालयातील खोलीमध्ये काळे कापडाचे सहाय्याने अंधार करुन नोटांची अल्ट्राव्हायोलेट बॅटरीचे सहाय्याने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर पाटील यांनी ती लाच रक्कम रु. 5,000/- रू माझे षर्टच्या उजव्या बाजुचे खिषात घडी करून ठेवली. त्यानंतर मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील वापरले मेमरी कार्ड काढुन सुरक्षित आपले जवळ ठेवले व रेकॉर्डरमध्ये नवीन सॅनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाशण ध्वनिमुद्रीत नसल्याची खात्री करून देवुन मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचा-यांना सापळ्याचे अनुषगाने योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर मोरे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तो माझे गळयात  अडकविला. तेथून मला व माझे मित्र अमित बुकषेट, पंच चव्हाण यांना पोलीस नाईक सागर कोळी यांची भेट घेण्यासाठी माझे स्कुटीवरून व पंचाचे मोटर सायकालवरून पाठविले. मोरे साहेब व त्यांचा स्टाफ आणि पंच नं. 2 श्री वेदपाठक असे त्यांचेकडील मोटर सायकलने आमचे पाठोपाठ आले होते. शाहुपूरी पोलीस ठाणेत गेल्यानंतर माझे व पोलीस नाईक सागर कोळी यांचेबरोबर वादातील इनोव्हा गाडीबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी माझे षर्टच्या डाव्या खिषातील लाच रक्कम 5,000/- रू. पोलीस नाईक सागर कोळी यांचेसमोर धरले असता त्यांनी काय नाही, संपले आता असे  म्हणुन ती लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्याने ती आपले पॅंटच्या पुढील बाजूच्या उजव्या खिषामध्ये ठेवली. त्यानंतर मी कार्यालयाबाहेर येवुन पोलीस नाईक सागर कोळी यांनी लाच रक्कम स्विकारलेबाबत मी माझे तोंडावरील मास्क काढून पुर्वनियोजित इशारा केला. तेव्हा मोरे साहेब व त्यांचे सोबतचा स्टाफ यांनी षाहुपूरी पोलीस ठाणेत जावून पोलीस नाईक सागर कोळी यांना पकडून ताबेत घेतले. तसेच मोरे साहेबांनी माझे गळयातील रेकॉर्डर बंद करून आपले ताब्यात घेतला. लागलीच पंच साक्षीदार यांचेसमक्ष मोरे साहेबांनी लाच रक्कम रु.5,000/- जप्त केली. सदर कारवाईमध्ये शाहुपूरी पोलीस ठाणेचे पोलीस नाईक सागर कोळी यांनी माझे मित्र नितीन कदम यांची माकडवाला वसाहतीतील तानाजी यांनी नेलेली वादातील इनोव्हा गाडी परत मिळवून दिली म्हणून माझेकडे सापळा कारवाई अगोदर 10,000/- रू. दि.25/10/2021 रोजी स्विकारलेचे कबूल करून दि.26/10/2021 रोजी 5,000/-रू लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी श्री सागर इरप्पा कोळी, व.व.43, पोलीस नाईक, ब.नं.579 नेमणूक षाहुपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर यांचेविरूध्द फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) or (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): shrikant tanaji ingavale

**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): shring1986111

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned by TapScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो. ठाणे अमलदार
शाहपुरी पोलिस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): rajesh ganesh gawali
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH86875

Scanned by TapScanner